# आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम सन 2017-18

## विधानसभा सदस्य:

बीड जिल्ह्यासाठी आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सन 2017-18 साठी एकूण सहा विधानसभा सदस्यांचा प्रत्येकी **रु.200.00 लक्ष** प्रमाणे **रु.1200.00 लक्ष** एवढा निधी बी.डी.एस. प्रणालीवर प्राप्त झालेला होता. सदर निधी पैकी मागील वर्षाचे दायित्व **रु.324.06 लक्ष** इतके वजा जाता प्रशासकीय मंजूरीसाठी दीडपटीत **रु.1313.91 लक्ष** एवढा वाव शिल्लक होता.

**रु.1251.89 लक्ष** रुपयांच्या 330 कामांना **प्रशासकीय मान्यता** प्रदान करण्यात आलेल्या आहेत. मागील वर्षांच्या अपूर्ण कामांचा निधी व नवीन कामांचा निधी असा एकूण **रु.1049.04 लक्ष निधी वितरीत** करण्यात आलेला आहे.

सन 2017-18 मध्ये शासनाकडून प्राप्त झालेल्या मूळ व पूरक निधीपैकी **रु. 1250.58 लक्ष** निधी शासनास दि.31मार्च 2018 रोजी समर्पित केला आहे.

## विधानपरिषद सदस्य:

बीड जिल्ह्यासाठी आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सन 2017-18 साठी एकूण तीन विधानपरिषद सदस्यांचा मिळून **रु.600.00 लक्ष** एवढा निधी बी.डी.एस. प्रणालीवर प्राप्त झालेला होता. सदर निधी पैकी मागील वर्षाचे दायित्व **रु.317.894 लक्ष** इतके वजा जाता प्रशासकीय मंजूरीसाठी दीडपटीत **रु.423.16 लक्ष** एवढा वाव शिल्लक होता.

**रु.282.11 लक्ष** रुपयांच्या 79 कामांना **प्रशासकीय मान्यता** दिलेली आहे. मागील वर्षांच्या अपूर्ण कामांचा निधी व नवीन कामांचा निधी असा एकूण **रु.341.27 लक्ष निधी वितरीत** करण्यात आलेला आहे.

सन 2017-18 मध्ये शासनाकडून प्राप्त झालेल्या मूळ व पूरक निधीपैकी **रु. 467.98 लक्ष** निधी शासनास दि.31मार्च 2018 रोजी समर्पित केला आहे.

**जिल्हा नियोजन अधिकारी,**
**जिल्हा नियोजन समिती,बीड**